[Year]

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७- अ अन्वये आदेश**

जा.क्र.सनिअ/बी-१/काक-७७अ/आदेश/गणेशकृपाहौ/सन१८ १००
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय
दिनांक १३/०३/२०१८

**वाचले:** १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ मधील तरतूद
२) श्री.उल्हास महादेव वाटकरे, सौ.उषम उल्हास वाटकरे यांचेकडील दिनांक १४/०९/२०१७ चे पत्र.
३) श्री.उल्हास महादेव वाटकरे, सौ.उषम उल्हास वाटकरे यांचेकडील दिनांक नसलेले पत्र
४) या कार्यालयाचे जा.क्र.४१७/ सन १७ दिनांक २५/०९/२०१७ चे पत्र
५) सौ.निला रविंद्र डहाके, अध्यक्ष व समिती संचालक यांचे दिनांक २९/०९/१७ चे राजिनामे

ज्याअर्थी ,गणेशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था म.चेंढरे अलिबाग, ता.अलिबाग जि. रायगड नोंदणी क्रमांक आरजीडी/अ`बीजी/एचएसजी/(टिसी)/ २५६६/सन २०१३, दिनांक १६/०४/२०१३ या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० या अधिनियमानुसार करण्यांत आली आहे.

ज्याअर्थी, संस्थेच्या कामकाजाबाबत श्री. उल्हास म. वाटकरे ,व सौ.उषम उल्हास वाटकरे यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत या कार्यालयाकडे वाचले क्र. २ व ३ नुसार तक्रार अर्ज दाखल केले असून, त्यामुळे संस्था पदाधिकारी व सभासद यांच्यामध्ये मतभेद असल्याने संस्थेच्या पदाधिकारी, समिती सदस्यांनी वाचले क्रमांक ५ नुसार त्यांचे पदाचे राजिनामे या कार्यालयाकडे सादर केलेले आहेत.

ज्याअर्थी संस्थेच्या पदाधिकारी व समिती वाचावे क्र.५ अन्वये त्यांचे पदाचे राजिनामे दिल्याने समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे.व समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे. त्याअर्थी संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (ब-१) मधील तरतूदीनुसार तात्काळ प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे क्रमप्राप्त असल्याचे माझे मत झाल्याने व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१) मधील परंतुक (२) मधील तरतूदीनुसार कारणे दाखवा नोटीस देणेची आवश्यकता नाही अशी या कार्यालयाची खात्री झालेली आहे.

त्याअर्थी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहे.

आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (ब-१) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारपरत्वे मी, रमेश शेरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग, गणेशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था,म.चेंढरे,ता.अलिबाग या संस्थेवर श्री. अनिल हरिश्चंद्र तांडेल, उपलेखा परिक्षक, अलिबाग यांची प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करीत आहे.

हा आदेश मी आज दि. १३/०३/२०१८ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिला असे.

ठिकाण: अलिबाग
दिनांक १३/०३/२०१८

13/3/18

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था अलिबाग

प्रत:

१.चेअरमन/सेकेटरी,

आपणास सूचित करण्यांत येते की संस्थेच्या दप्तराचा तसेच मालमत्तेचा ताबा नवनियुक्त अधिका-यांकडे तात्काळ सादर करावा.

२. श्री. प्राधीकृत अधिकारी, अधिन जिल्हा विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१,सह

३.शाखाधिकारी, रायगड जिल्हा मध्य.सह.बँक, शाखा-अलिबाग

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग

२.मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था अलि